*बल्लारपुर विधानसभा क्षेत्र सर्वोत्तम ठरावे यादृष्टीने प्रयत्नांची पराकाष्ठा करणार-सुधीर मुनगंटीवार*

*राजोली येथे 10 कोटी रू. किंमतीच्या मोठया पुलाचे लोकार्पण व प्रा.आ. कैंद्राचे भुमिपुजन संपन्न*
=====================================================================

विकासकामे, लोककल्याणकारी उपक्रम यांच्या माध्यमातुन बल्लारपुर विधानसभा मतदार संघ देशात कौतुकास्पद ठरेल अशा पध्दतीने आपण विकसित करीत आहोत. या मतदार संघात सिंचन, रस्ते, पाणी पुरवठा योजना आदींना अग्रक्रम देत विकासाच्या मार्गावर आपण पुढे नेत आहोत. एका वर्षात रमाई घरकुल योजनेअंतर्गत 7 हजार घरे आपण मंजुर केली आहेत. मतदार संघात 100 टक्के गावांमध्ये आरो मशीन लावण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्नशीत आहोत. प्रत्येक अंगणवाडी आयएसओ मानांकित करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे. मिशन दीनदयाल अंतर्गत दारिद्रयरेषेवरील नागरिकांना सुध्दा आपण स्वस्त दरात धान्य उपलब्ध करण्याचा निर्णय आपण घेतला आहे. या मतदार संघातील नागरिकांच्या शुभेच्छा व आशिर्वादाच्या बळावर राज्याचा मंत्री होण्याचे भाग्य मला लाभले. नागरिकांच्या प्रेमाला मी कधीही उतराई होणार नाही, हा मतदार संघ सर्वोत्तम ठरावा यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करेन असे प्रतिपादन राज्याचे अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

दि. 6 मार्च रोजी मुल तालुक्यातील राजोली येथे पेठगाव-राजोली-तांबेगडी मेंढा या रस्त्यावरील 10 कोटी रू. किंमतीच्या मोठया पुलाचे लोकार्पण व राजोली येथील 7.50 कोटी रू. किंमतीच्या प्राथमिक आरोग्य कैंद्राच्या इमारतीचे भुमिपुजन अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते संपन्न झाले. या निमित्ताने आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी मंचावर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष कृष्णा सहारे, माजी जि.प. अध्यक्षा सौ. संध्या गुरनुले, जिल्हा परिषदेचे सभापती संतोष तंगडपल्लीवार, पंचायत समितीच्या सभापती सौ. पुजा डोहणे, उपसभापती चंदु मारगोनवार, जि.प. सदस्य नागराज गेडाम, पंचायत समिती सदस्य घनश्याम जुमनाके, वर्षा लोनबले, जयश्री वलकेवार, मुलचे नगरसेवक चंद्रकांत आष्टनकर, डोंगरगावचे सरपंच मुकेश गेडाम, माजी उपसभापती गजानन वलकेवार, सुरेश पाटील ठिकरे, विजय पाकमोडे यांच्यासह कार्यकारी अभियंता श्री. कोठारी, श्री. बुरांडे आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

यावेळी बालेतांना अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार पुढे म्हणाले, मी विरोधी पक्षाचा आमदार असतांना सुध्दा माजी मुख्यमंत्री कर्मवीर मा.सा. कन्नमवार यांचे स्मारक मुल शहरात उभारण्यासाठी यशस्वी प्रयत्न केला. चिचडोह हा महत्वाकांक्षी सिंचन प्रकल्प आपण पुर्ण केला असुन कोटगल

प्रकल्प सुध्दा पुर्ण करत आहे. गोसीखुर्द प्रकल्पाचे पाणी सुध्दा केंद्राचा सर्व्हे झाल्यावर मिळणार आहे. पोंभुर्णा आणि मुल या तालुक्यात धान उत्पादक शेतक-यांच्या प्रगतीच्या दृष्टीने राईस क्लस्टर आपण सुरु करीत आहोत. आयुष्यमान भारत योजनेचा लाभ या भागातील नागरिकांना मिळण्याच्या दृष्टीने आपण स्वतंत्र यंत्रणा आखली आहे. उज्वला योजनेअंतर्गत सर्वांना गॅस कनेक्शन उपलब्ध करण्यात आले आहे. 2515 या लेखाशिर्षा अंतर्गत गावातील अंतर्गत रस्ते, सामाजिक सभागृह व नाली बांधकामासाठी मोठया प्रमाणावर निधी आपण उपलब्ध करुन दिला आहे. शिर्डी संस्थानने 15 कोटी रूपयांचा निधी मंजुर केला असुन त्यातुन जिल्हा सामान्य रूग्णालयासाठी एमआरआय मशिन केली असुन लवकरच 20 रूग्णवाहीका शिर्डी संस्थान उपलब्ध करणार आहे. निराधार व्यक्तींना देण्यात येणा-या अर्थसहाय्याच्या रकमेत वाढ करण्याचा निर्णय आपण लवकरच घेणार आहोत. नागरिकांना सर्व सोयीसुविधा उपलब्ध करुन देत सर्वसमावेशक विकास प्रक्रिया आपण राबवित असल्याचे अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यावेळी बोलतांना म्हणाले. यावेळी माजी जि.प. अध्यक्षा सौ. संध्या गुरनुले यांचेही भाषण झाले.

यावेळी राजोली येथील नागरिकांनी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे जोरदार स्वागत केले. ढोलताशांच्या गजरात आणि फटाक्यांची आतिशबाजी करत त्यांनी अर्थमंत्र्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाला राजोली तसेच परिसरातील गावांमधील नागरिकांची मोठया संख्येने उपस्थिती होती.